सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 398 ठ. क्र. 398 दि. 29/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र. ४१ मध्ये सुमैय्या नगर ते स्वागत नगर, देसाई नगर याठिकाणी नैसर्गीक (नॅचरल) पाणी वाहत आहे. तरी याठिकाणी अनेक वर्षापासून पाण्याची वहिवाट आहे. त्याठिकाणी काही खाजगी ओपन प्लॉट आहेत. तसेच सुमैय्या नगर मधून काही खाजगी मालकीच्या ओपन असलेल्या प्लॉटमधून नैसर्गिक पाणी वहात आहे. कारण या ठिकाणी गेल्या तीस ते चाळीस वर्षापासून हे नैसर्गिकरित्या पाणी वहात आहे. पक्का नाला नसल्यामुळे नाल्याच्या क्षेत्रामध्ये येणा-या अनेक सखल घरामध्ये सुसाट वेगाने वाहणारे पाणी घुसून संसारोपयोगी वस्तुंची व घराची नासधुस होत असल्याने संबंधित नाल्यामुळे परिसरात अत्यंत घाणीचे साम्राज्य पसरले आहे. संबंधित ठिकाणी पाण्याचा निचरा करणेकरिता महापालिकेचे कर्मचारी व अधिकारी आले असता, सदर प्लॉटधारक कामात अडथळा आणून काम थांबवित आहेत. सदर ठिकाणी नाला ट्रेडिंगचा सर्व्हे होऊन नाला मंजूर करण्यांत आलेला आहे. तरी सदर जागा नाल्यासाठी आरक्षित करुन पक्का नाला बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ३१९ ठ. क्र. ३१५
दि. २९/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्रातील सर्व व्यापा-यांसाठी अभय योजना लागू करण्यात आली होती. सदरील योजनेचा लाभ घेण्याकरिता दिलेली मुदत संपलेली आहे. ती फार कमी कालावधीकरिता देण्यात आली होती. त्यामुळे या योजनेचा लाभ ब-याच व्यापा-यांना मिळू शकलेला नाही. अभय योजनेच्या लाभापासून बरेच व्यापारी वंचित राहिले आहेत. पुनश्च एकदा तीन महिन्याकरिता मुदतवाढ देऊन अभय योजना चालू करावी. जेणेकरुन योजनेमुळे महानगरपालिकेमध्ये एलबीटीच्या रुपाने पैसे जमा होतील. या योजनेस मुदतवाढ मिळाल्यास त्याचा लाभ व्यापारीवर्गा बरोबर महानगरपालिकेस होईल. तरी अभय योजनेस तीन महिन्याची वाढीव मुदत देणेसाठी मा. महाराष्ट्र शासनास विनंती करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.329.ठ. क्र...326
दि.29/12/16...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ३५ मधील शास्त्री नगर परिसरातील प्लॉ.नं. १७ विटभट्टी समोरील भागास यादे **हुसेन मोहोल्ला** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 322 ठ. क्र. 3914
दि. 29/12/96 रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या कंम्पाऊंड मधील कॅन्टीनची जागा कॅन्टीन चालविण्याकरिता श्री. सागर शिवाज चव्हाण रा. सुरवसे नगर, कुमठा नाका, सोलापूर हे सुशिक्षीत बेरोजगार असून, त्यांचे उदरनिर्वाहसाठी देण्यात यावी जेणेकरुन त्यांचे रोजगार उपलब्ध होईल व महापालिकेच्या कर्मचा-यांना सोयी-सुविधा उपलब्ध होऊन तरी त्यांना महानगरपालिकेच्या नियमानुसार भाडे आकारुन २९ वर्षे ११ महिने या कराराने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३२४ ठ. क्र. ३२६
दि. २९/११/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ३६ संत तुकाराम नगर येथील आरक्षित जागा सिटी सर्व्हे नंबर ५१/२ ओपन चिल्ड्रन पार्क/प्लेग्राउंडसाठी आरक्षित असून, सदर ठिकाणी असलेल्या जागेवर तेथील नागरिकांकडून अतिक्रमण होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर जागेच्या सुरक्षिततेसाठी आणि चिल्ड्रन पार्कसाठी आरक्षित असलेल्या जागेवर कंपौंडवॉल बांधणेकामी र.रु. ५.०० लाख इतकी भांडवली कामे सन २०१६-१७ या बजेट सदरातून तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी वरील ठिकाणी असलेल्या खाजगी जागेवर कंपौंडवॉल बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 326 ठ. क्र. 320
दि. 29.12.2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री संत मुक्ताई सांस्कृतिक प्रतिष्ठान सोलापूर ही संस्था रजिष्टर्ड असून या संस्थेकडून सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले जाते. सदर संस्थेच्या वतीने मोफत वारकरी शिक्षण देणे, बाल संस्कार शिबीर, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, दंत तपासणी शिबीर, वृक्षारोपण, व्याख्यानमाला अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सदर संस्थेला सामाजिक कार्य करण्यासाठी जागेची अत्यंत आवश्यक असल्याने राजेश कोठे नगर, धुम्मा वस्ती जवळ, लक्ष्मीपेठ सोलापूर येथे श्री संत मुक्ताई सांस्कृतिक प्रतिष्ठान सोलापूर यांच्या मालकीच्या जागेवर बांधण्यात आले असून सदरची जागा शासनास विनामुल्य देऊन जे समाज मंदिर बांधण्यात आले आहे ते समाज मंदिर म्हणून श्री. संत मुक्ताई सांस्कृतिक प्रतिष्ठान सोलापूर या संस्थेस ९९ वर्षाचे करारावर नाममात्र भाडयाने खास बाब म्हणून देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 32 ठ. क्र....329
दि: 29/12/2016...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील किडवाई चौक ते सिव्हील चौक या रस्त्याला या शहरामध्ये असलेल्या रहिवाशांना ७० वर्षे वैद्यकीय क्षेत्रात सर्वोकृष्ट कार्य करुन चांगले आरोग्य देण्यासाठी सातत्याने कार्यरत राहून आपल्या या कार्याचा ठसा उमटविण्या-या आणि समाजोपयोगी कार्यामध्ये स्वतःला झोकून दिलेले **डॉ. सय्यद बशीर** यांचे नांव देणेस, त्यांचे नावाचा नामफलक लावणेस येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३२८ ठ. क्र. ३२२
दि. २९/३/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरात लोककल्याणार्थ विश्वशांती निमित्त महाराष्ट्रात प्रथमच १०८ हवन कुंडाने सहस्त्रचंडी यज्ञ दि. २९ मार्च २०१७ ते ५ एप्रील २०१७ पर्यंत कुचन प्रशाला, रविवार पेठ, सोलापूर या ठिकाणी आयोजित केले असून या कार्यक्रमास देशभरातून संत महात्मे, राजकीय, सामाजिक, धार्मिक व्यक्ती, राज्यपाल, मुख्यमंत्री उपस्थित राहणार असून या कार्यक्रमास अंदाजे १ कोटी रुपये पर्यंत खर्च येणार आहे. तरी महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक निधी देऊन सहकार्य करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 329 ठ. क्र. 323 दि. 29/11/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २८ पोगुलमळा येथील पिण्याच्या पाण्याचे प्रेशर सुधारणासाठी पाईपलाईन घालणे व जोड करणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने व त्या भागातील नागरिकांच्या पिण्याचे पाण्याची गैरसोय टाळणेचे दृष्टीकोनातून मक्तेदार मयुरा कन्स्ट्रक्शन यांचे पूर्वगणनपत्रक र.रु. ४,७४,३१५/- या दराचे १ टक्के कमी या दराने तातडीने मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये करुन घेणेत आलेले असून, सदरची बाब माहितीस्तव मा. स्थायी समितीकडे व मनपा सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा.म.न.पा.सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ३७९ दि. ३०-८-१६ चे शिफारसीने आलेले प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज330/335ठ. क्र......328
दि.29.12.2016.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

330/335

हिंदू महासभेचे सोलापूरातील पहिले आमदार म्हणून ज्यांना ओळखले जाते ते सर्वसामान्यांचे आबा उर्फ धर्मवीर वि. रा. पाटील यांचा सोलापूरच्या ऐतिहासिक जडणघडणीत महत्वाचा वाटा आहे. त्याच बरोबर त्यांचा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत सिंहाचा वाटा आहे. सोलापूर शहराच्या त्या काळच्या नगरपालिकेमध्ये अखंड पाच दशकाहून अधिक काळ ते नगरसेवक पदी विराजमान होते. त्याकाळी नगरपालिकेला महानगरपालिकेत रुपांतर करण्यात व सध्याच्या महानगरपालिकेचे कार्यालय अर्थात इंद्रभुवन मनपाला मिळवून देण्यात अतिमहत्वाची भूमिका धर्मवीर वि.रा. पाटील यांनी बजावली होती. त्याचे बालपणासह संपूर्ण जीवन शिवस्मारक आत्ताचे नवीपेठ, टिळक चौक, समाचार चौक, दत्त चौक, गणपती घाट या परिसरात गेले आहे. म्हणून या मध्यवर्ती ठिकाणीच त्यांचे स्मारक व्हावे व नवीपेठेतील संपूर्ण व्यापारी क्षेत्राला अर्थात **नवीपेठेस धर्मवीर वि. रा. पाटील व्यापारपेठ व पंचकट्टा ते दत्त चौक ते सुभाष चौक या ऐतिहासिक मार्गाला धर्मवीर वि. रा. पाटील मार्ग** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका